# पावन-धारा

काव्य संग्रह ]

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २४९३

*
***

## श्री बजरंगबली चरणी समर्पण

कवि - श्री. पां. या. कावडे बी. ए. १
हिन्दी कोविद
पावन कुटी, वर्धा

***
*

REFBK-0022850
REFBK-0022850

मंडळी सेवा मारोती देवस्थान
जी ( मोठी )

किमत ) सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन ( २ रुपये

प्रकाशन दि. १ मे १९७९

# - कविचे दोन शब्द -

प्रिय वाचक;

सप्रेम प्रणाम

मी आपणा सेवेशी निबंध सधना सुवर्ण पंक्ती, व चार अेकांकी नंतर हा **पावनधारा** काव्य संग्रह सादर केलेला आहे. ह्यात ५४ (चोपन) विषय हाताळलेले आहेत. शेतकरी, स्त्री व सर्व सामान्य मजूर यांचे जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या सुद्धा कविता दिलेल्या आहे. याशिवाय जीवनाला आवश्यक बोधप्रद विषय सुध्दा हाताळले आहेत. सर्वांसाठी अभंगवृत्त असून अधून मधून पादाकुलवक वृत्तांचा उपयोग केलेला आहे कांही चुका क्षम्य आहेत. कारण कल्पना महत्वाची आहे. तेव्हा ह्या काव्य संग्रहाकडे पाहण्याचा दृष्टीकोन पवित्र असावा. व ह्या सर्व कविता पचनी पाडून घ्याव्या ही नम्र विनंती.

परमेश्वर आपणास सुयश देवो !

- आपला -

पां. या. कावडे
कवि

काव्य
२२८५.०
२४९३

# - अभिप्राय -

पावनधारा ह्या निमित्ताने अभिप्राय प्रित्यर्थ खालील दोन शब्द :-सर्व सामान्यांच्या दैनंदीन जीवनांत घडणाऱ्या विविध घटना विषय म्हणून निवडल्या गेल्या आहेत. अत्यंत सोप्या पण प्रभावी भाषेत कवीने आपली प्रतिभा प्रसवली आहे.

'पावन-धारा' ह्या काव्य संग्रह सर्वांकरिता वाचनीय व उद्बोधक ठरेल अशी आशा करण्यास काही हरकत नाही.

माझ्या हार्दिक शुभेच्छा व्यक्त करुन हा अभिप्राय संपवितो.

REFBK-0022850
REFBK-0022850

सेलू,
दि. ५-१-७९

स्थुल साहेब
स. उ. शि. अ.
पं. स. सेलू

# कवि परिचय

कवि – श्री. पां. या. कावडे यांचे पूर्ण नाव श्री पांडूरंग यादवराव कावडे असे आहे यांना राधासुत सुद्धा म्हणतात हे १-७-१९३९ ला सोनेगांव (स्टेशन) जि वर्धा येथे शेंतकरी कुळात जन्मास आले यांचा मूळचा व्यवसाय शेती हा आहे. यांचे शिक्षण बी. अे १ पर्यंतच झाले आहे. सध्या हे प्राथमिक शाळा खैरी (पं. स. सेलू) येथे मुख्याध्यापक आहेत. आज पर्यन्त यांनी निबंध साधना सुवर्ण पंक्ती, चार अेकांकी ही पुस्तके प्रकाशित केलेली आहेत. यांची भाषा रुबाबदार, साधी, प्रेमळ वाटते सरळ पणा व सुटसुटीत वाक्य रचना हे याच्या भाषा शैलीचे वैशिष्टय आहे तसेच यांचे लिखानाचा समाजावर विशेष परिणाम त्वरीत होतो हे वर्धा जिल्हयात उत्तम शिक्षक उत्तम मुख्याध्यापक म्हणून जसे प्रसिद्ध आहेत. तसेच उत्तम लेखक व कवि म्हणूनहि प्रसिद्ध आहेत यांचा लेखन व्यवसाय सतत सुरुच असतो तसेच हे अभ्यासू सुद्धा आहेत हे कष्टाळू उदार व मायाळू वृत्तीचे असून कधी कधी हे फारच स्वाभिमानी दिसून येतात. समाज सेवा व साहित्य सेवा हे त्यांचे ध्येय आहे

–: आपले विनित :–

श्री संत मंडळी सेवा मारुती देवस्थान

(आंजी जवळ) जि. वर्धा

---

टिप – पावन-धारा हा काव्य संग्रह छोटा आहे की, मोठा आहे. कविता कमी आहे कि जास्त आहे हे न पाहता दिलेले विषय योग्य तऱ्हेनें हाताळलेले आहे किंवा नाही याचा विचार वाचकांनी करावयाचा आहे.

विनंती
ओढ कायम राखण्या
ओढ्या काठचा देखावा
प्रणाम
महाराष्ट्र भूमि
जगांत नोंदवा
कुत्रा
आशिर्वाद
भारतीय राष्ट्रध्वज
सोन्याचे झाड
शेतकरी
स्वागत
स्वप्न
रूप दर्शन
सौख्यदीप जळो
स्वर्गीय ठेवा
मनोगत
पंधरा आगष्ट
ये परतुनि
शिळ
कविता
छळ
विरह
मारुतीराया वर देजा
उकलू द्या
अवतरी हरि
गुढी
उठा विरांनो स्वानंदाने
श्री लक्ष्मी
वर्षा प्रहर
श्री पंडित नेहरु
शेतकऱ्याचे स्वप्न
कां ?
माझा गांव
स्मरण (म. गांधी)
दिवाळी
हरि भजन
बाळ
झोपडीत
भारत
पावन धार
पाळा
पणती
उत्पत्ती
आठवा
संत महिमा
भक्ताची आस
अतृप्त
बचत
वेळ
श्री बजरंगबली
कृपादृष्टी
आशिर्वाद
स्त्री

काव्य
२४९३
२२८५०
१६।३।८०
२१८मेरा

# – वि नं ती –

देवा मी लहान। तुझे पुढेलीन
करी तू पालन। या बाळाचे – १
नमीतो तुला मी। कर जोडूनीया
ठेवा कृपा छाया। माझेवर – २
देवा माझ्यावर। ध्यान ठेवा सदा
येईल आपदा : नष्ट करा – ३
रवि चंद्रावर। जाईल मी जेव्हा
प्रयत्नास साथ। देजा तेव्हा – ४
छोटे, मोठे साहस। घडेल बा जेव्हा
कृपा दृष्टी ठेवा। देवा तेव्हा – ५
किर्तीचे डोंगरी। साथ तुझी हवी
पुष्पांचे वर्षावी। जेथें तेथें – ६
सुख दुःखाचे वेळी। आसरा तुझाच
तुझे विण कष्ट। सारे व्यर्थ – ७
सानुल्या बाळाची। ऐका ही विनंती
साह्य ध्येय पूर्ती। असू द्यावे – ८

कवि–
पी. या. कावडे

(२)

# ब्रीद कायम राखण्या

आग पेटली उत्तरी । चलाचला समाराय
भारतभूची किर्ती ही । अभंग अशी राखाया - १

आमुची किर्ती उज्वल । मुळा पासून अखेर
कलंक लावण्यास हे । दुष्ट करताती जोर - २

अशा दुष्टांना नष्टण्या । संघटित व्हा सारेजणी
शस्त्रांचा वापर सुद्धा । त्वरा करा हो त्याक्षणी-३

सत्य शांतीची ही ज्योत । सदा तेवत ठेवण्या
भारत असे हा अग्र । ब्रीद कायम राखण्या - ४

-००-

(३)

# ओढ्या काठचा देखावा

लांबलांब वळण तूनि । ओढा सतत वाहतो
शब्द दन नाद याचा । खळ खळ असा होतो - १

वाळू माती पसारात । बाळ गोपाळ खेळत
गाई गुरे जमा होत । कोवळ्या हा किरनात - २

पाणी भराया लागली । जणू स्त्रियांची ही रीघ
दृश्य बघता हे त्यांचे । भासे घट नृत्य भेंड – ३

खोलवर जलाशयी । पोहतात कुणी कुणी
अंतर चीं पाप सारी । टाकी धुवूनि पुसुनी – ४

बाजूला त्या कडेवर । नंदी बैलांचा हो मेळ
छान सावकाश त्यांची । घाली किसान आंघोळ – ५

हिरव्या लव्हाळी स्थळी । भाग खडकांचा अति
गांवातील वस्त्रे तेथे । धूतसे बुवा बरठी – ६

दुरवर बघा जरा । याला किती अडथळे
सांचलेले पाणी तेथें । त्यात कोळी मासे धरे
कडेवर याच्या । एक देवूळ शंकराचे
सांज सकाळ हो तेथें । सुरु कितंन हरिचे – ८

टाळ मृदूंगाचा ध्वनि । याच्या लाटेत मिसळे
अंतरीचा दुःखे सारी । येथे मानव विसरे – ९

✻✻

# — प्र णा म —

प्रणाम माझा तुला टिळका
देशभक्ता तू लोक नायका
राजकारणी तू धुरंदरा
प्रणाम घे हा अनेक वेळा — १

माय भूमिला सोडविण्यास
भोगिला बहु तू त्रास
तुरुंग वासहि जन्म ठेवा
प्रणाम माझा तुला टिळका — २

स्वातंत्र्याचा हक्कच माझा
गर्जूनीं सांगू आम्ही जगा
प्राण गेला तरि सोडुन एका
प्रणाम माझा तुला टिळका — ३

सोडूनि गेला जरि भारता
शिकवण तुझी ही स्वतंत्रता
अमर मंत्र हा हिंदू लोका
प्रणाम माझा तूला टिळका — ४

* * *

# महाराष्ट्रभूमि

महाराष्ट्र भूमि । महाराष्ट्र भूमि
कापूस जोंधळा : पिके येथें नामी – १

सह्यांद्रि सज्ज हा । हिमगिरी साथी
स्वदेश रक्षण्या । धांव याची पुढति – २

गोदा, कृष्णा, भिमा । वर्धा तापी, पूर्णा
देति मंगल माता । जीवन पिकांना – ३

शिवरायाची ही । असे पुण्य भूमि
समकालीन हे । तुका दास, दोन्ही – ४

भाषा मराठी ये । वाणी सुरसाळ
हिचा आद्य जनक । संत ज्ञानेश्वर – ५

भाविक जनांचा । मेळा पंढरपुरी
आषाढी कार्तीकी । पुण्य ह्या नगरी – ६

सव्वीस जिल्ह्यात । संसार मराठीचा
सुसंपन्न होवो । महाराष्ट्र माझा – ७

-•——•-

# जगात नांदवा

लवंग विलायची । मिरे, फुले धने
खोबरा कलमी । मिश्रण आदि पाने १

यांच्या भृकटीनें । बनला मसाला
अन्नात टाकता । अन्न ये चविला २

पंच प्राणाने । देह बनविला
आत्मा त्यात ठेवूनि । तुला बोलविला ३

तुझ्या ह्या देहाने । काही तरी करावा
अमोल हा देह । सार्थकी लाव बा ४

झाडे झुडपे सुद्धा । जगाविनी जीवा
जीवीताचे सार्थक । करीती बा तेव्हा ५

गाई, बैल, म्हशी, करी - जन - सेवा
चंदना समान । झिजविती देहा ६

जळते पणती । अंधाराच्या नाथा
भटक्या प्रवाशा । जीवनाचो आथा ७

तुम्ही मानवांनो । जगा आणि जगवा
शांती, सत्य प्रेम । जगात नांदवा ८

# कुत्रा

चाहूल लागता । भूं भूं भूं भुंकतो
धोक्यापासून हा । बचाव करतो १

शेत घर यांची । राखन करतो
मालधन्याला हा । कानसुळी देतो २

चोरी, खुन यांचा । शोध लावी खरा
जोवा भावाचा हा । मित्र मोठा कुत्रा ३

संकटकाळी हा । सहाय्यास होतो
आप्पेष्टा समान । रक्षण करतो ४

जे आपण देतो । त्यावर जगतो
धन्याचे अन्नाहा । इमानदार होतो ५

गरीब-अमीर । नसे हे अंतर
कोण धनी मित्र । जाणे हा सत्वर ६

जरी पशु आहे । घ्यावे हे शिक्षण
योग्य वागण्याचे । याचे जवळून ७

(८)

## आशिर्वाद

लग्न जुळले पोरीचे । पत्रिका द्या गांवोगांवी
उद्या येणार वरात । येजा स्वागता समयी १

सजवा मंडप कुणी । हिरव्या हवा डहाळचांनी
तोरण बांधा कुणी । कुणी सजवा फुलांनी २

चाले आले नवरदेव । आणा मंडपी त्वरीत
ठेवा समोर नवरी । सुरु करा मंगलाष्टक ३

बॅन्ड-बाजाचे स्वरात । लग्न लावा सावचित
दोन जिवाचे मीलनास । द्यावा मंडळी आशिर्वाद ४

***

(९)

## भारतीय राष्ट्रध्वज

तू आमुचा प्राण
तू आमुचा मान
स्वातंत्र्याचे प्रतिक
तू एक महान १

तू हो स्फुर्ति स्थान
तू हो दैदिप्य मान
तू हो अग्रस्थान
तिरंगी निशान २

तू हो बलवान
तू हो शिलवान
तू हो धैर्यवान
तू हो यशोगान ३

तरंगा निशान स्वातंत्र्याचे प्रतिक
तू एक महान

***

[१०]

# सोन्याचे झाड

पऱ्हाटी पेरली शेतात ग माझ्या
कापसाच्या हगामी येईल ग मजा १

वेतिल ग सखी वेचल्या कापूस
शेतात ग पूजू देवीं सितेस २

भरेल ग गाडी कापसाची माझी
विकण्या नेईल घर धनी बाजी ३

रुपये घेतिल खण खण नगदी
आनंदी आनंद माझे घरामधी ४

सोन्याचे झाड ग पऱ्हाटी माझी
काम धेनू गाय ग पऱ्हाटी माझी ५

पैशाचा ठेवा ग पऱ्हाटी माझी
सुखाचा ठेवा ग पऱ्हाटी माझी ६

ऐश्वर्याचा गाभा ग पऱ्हाटी माझी
वैभवाचा शेंडा ग पऱ्हाटी माझी ७

पऱ्हाटी माझी ग पऱ्हाटी माझी
पऱ्हाटी माझी ग पऱ्हाटी माझी ८

——

(११)

# शेतकरी

मूर्ती दैन्याची खपे शेतावरी
उन वारा पाणी सदा शिरावरी १

चटणी कांदा कधी शिळच भाकरी
पोट कसा तरी भरे शेतकरी २

(११)

वस्त्र अंगावरी जाडजूड जरी
स्वच्छ मन त्याचे स्फटिकापरि ३

करी कष्टी आधी मग फळ घेई
जिवनाची गाथा अशी याची राहो ४

धनधान्य याच्या साठवून राशी
निरंतर चिंता वाहे जगताची ५

असा शेतकरी थोर व उदार
वर्णू किती तरी शब्द हे अपूर ६

(१२)

# स्वागत

उंबरठ्यावर उभी वाट कुणाची पाहते
प्राण सख्या तुझा आज सखे येणार का येथें १

अंतरात हर्ष तुझ्या मावे मावे नासा झाला
नको होवून अधिर उभी अशी स्वागताला २

बहु दिवसाची आस पुरी होणार ग तुझी
भेटता सखा तुझा उरी घालशिल मिठी ३

[१३]

# स्वप्न

नदीच्या ग तिरावर कुणी तरी दिसे गडे
शिळ त्यांची कानी येता मन माझ थरथरे १

काही दिन असे जाता हळू हळू दृष्ट पडे
लाज मला मग येई कशी जावू त्यांच्या पुढे २

एक दिन अचानक भेट माझी कशी पडे
लांब लांब कलनिले कांही न कळे तेव्हा पुढे ३

मग येता घराकडे देह भान येई गडे
उमजले हे ग थोडे जाग जेव्हा येता गडे ४

[१४]

# रुप दर्शन

सुंदर ते रुप उभे ओटयावर
नजर मजवर ठेवितसे १

वरुन पितांबर शोभे नक्षिदार
चोळी अंगावर तंग दिसे २

डोळे पाणीदार स्फटिका समान
रुप त्यात छान माझे दिसे ३

वर्ण गोरापान अंग मुलायम
गुलाबा समान प्रफुल्लित ४

हात पाय मांड्या नाक कान मान
ओतीव घडण दिसे जशी ५

कटि ही बारीक वृक्ष स्थूळ उच
यवनाचा घाट शोभिवंत ६

डोक्यावर जटा काळ्या काळ्या भोर
मुख हे कमल शोभे जणू ७

गुलाबी हे गाल लुक लुक दिसे
हासरा चेहरा खुणवितसे ८

असे हेच रुप हर वेळा घडे
काम हिचे मनी मज न कळे ९

***

(१५)

# सौख्यदीप जळो !

लक्षावधि जन खपे गिरणीत
घाम गळे त्यांचा धन्या नवनीत १

विचार करता उपासमारी त्यांची
मिळेना मजुरी पोटाहि पुरती २

तुम्ही मालकांनो विचार पूर्ण करा
मजुरी वाढवा पुरी भरा भरा ३

मजुर संतोषी नोटा लक्षावधी
चढेल बाणखी ऐश्वर्याची धुंदी ४

मजूर सुखी तर सारे जग सुखी
तुमच्या सुखाची नाही तर माती ५

मजुरांचा तुम्ही पाहु नका अंत
बाळगा थोडी तरी हृदयाशी खंत ६

ऐश्वर्याचा लाभ मजुरांना मिळो
सर्वां घरोघरी सौख्यदिप जळो ! ७

-०——०-

(१६)

# स्वर्गीय ठेवा

आज संक्रांतीचा दिन । नांव घे ग आजंवून
जीवनाचा भेद-भाव । जा ग आता विसरुन – १
लाजू नको घडोघडी । लग्नाचीच ही ग वेडी
सुटेना जन्म जन्मांतरी । इतिहास साक्ष खरी – २

संसाराची घडामोड । चाले असा जरी खेळ
'स्वर्गीय ठेवा असा हा'
स्त्रीया एक एक पति देव - ३

०:—:०

(१७)

# मनोगत

दु मजली माडीवर । साडी वाळते हिरवी
पति राजावर मी ग । दृष्ट दुरुनि पुरवी - १

आठवण त्यांची होता । मी हासते गालीच्या गाली
वाळलेली ही ग साडी । पुन्हा असूंनी भिजलेली - २

हृदयांत माझ्या आता । मुर्ती त्यांची समावली
जन्मोजन्मी मी ग बाई । त्यांच्या पायी बांधलेली - ३

आस माझी एक हीच । पुरी होईल ग केव्हा ?
हृदयी साठीला गोळा । हो ! आई म्हणेल जेव्हा - ४

[१८]

# पंधरा आगष्ट

अनमोल दिन : पंधरा आगष्ट

सर्वंच आठवा । वंभवास बत —१

सूवर्णाचा धूर । निघे ह्या देशांत

धन, पिके आणि । कलेत निष्णांत —२

विसरता थोडा । अंग्रजाचा काळ

गुलाम गिरीची । असे ती कुवेळ —३

असंख्य बळीत । प्राप्त हा सुदिन

मंगल मंगल । काळ हा सुवर्ण —४

प्रतिज्ञा आमुची । दीन करु नष्ट

समतेचे राज्य । निर्मू निवडीत —५

कला व विज्ञान । आर्थिक जीवन

राहू ह्यात आम्ही । सर्वांत सपन्न —६

भेद भावो जावो । आज देशातुन

समानता दिन । येवो उत्सवातून —७

[१९)

# ये परतुनी

झोपत असता गेली कुठे तू
दोन अर्भक घेवुनिया
वाट तुझी ती खचित चुकली
ये परतूनी स्वगृहीया १

माहेरच्या त्या सर्वस्वार
सोड सोड गे तू ही आशा
झोपडीत ह्या मांद सुखे ग
पुऱ्या होतील तुझ्या मनीषा २

-०——०-

(२०)

# – शिल –

श्रेष्ठ विद्या, श्रेष्ठ धन
श्रेष्ठ तन, श्रेष्ठ मन १

पण याहि पेक्षा ! श्रेष्ठ असे कोण ?
सांगा सर्वजन ? हे शिल वर्तन २

०:–१०

(२१)

# – कविता –

हो असे प्रसंगता । नाम तुझे कविता

थोर ही कल्पकता । संपुर्णता सत्यता १

हीच असे पुर्णता । मान मिळे जगता

सुवाद मधुरता । लाभे जशा सौख्यता २

(२२)

# छळ

गरीब बंधू मरे मरे तो

कष्ट करीतो घाम गळे तो

परंतु पैसा अपुरा मिळतो

अन्ना वाचूनि हो तळमळतो १

मिष्टान्न खावूनि गप्पा मारितो
मजेत लोळे गाद्या वरती
हासत हासत निद्रा घेतो
धनिक अमुचा रंग महाली २

रक्ताचे करी गरीब पाणी
परंतु महाल बांधे धनीही
दिनाच्या ना ठयानी मनीही
मन हे सारे अपुल्या कामी ३

शान जगाची करुनी सारी
ऐटीन फिरतो सारे शहरी
परंतू अपुला बंधू हा दिन
मरे येथेच कष्ट ही करुन ४

खावुनि खावुनि पोट येई वरि
अन्न पचेना लोळे भूवरि
परंतु अपुला बंधू हा दिन
मरे उपासी अन्ना वाचून ५

अरे! धनिक हो छळाल कितीहि
पर्वा न त्याची आम्हा जराहि
देह असे तो करु कामहि
मरुन जावू न ठाव कुणाहि ६

याल तुम्हीहि जेथें आम्ही
महाल माड्या सोडूनि धनहि
मग कां हो हा भेद मानुनि
छळता पशिवाहि ७

(२१)

# विरह

वसंत फुलला । बहरली वेल
तरि योगायोगाची । का न आली वेळ १

चांदण्याची रात्र । उलथून गेली
मुलाखतीची वेळा । अजून कां न आली २

हृदयाची हाक । हृदया मिळाली
मिलनाची रात्र । अजून कां न झाली ३

मीहि एकटाच । तू पण एकटी
युगे युगे भेट । होईल कां अंती ४

(१४)

## मारुतीराया वर देना

बैलगाडी जुंपा राया । देव दर्शनाला जावू
चैत्र पौर्णिमेचे दिनी । भेट मारुतीची घेवू १

तिथे येति बहुजन । होते मेळावा दर्शन
भेट होता मारुतीची । होते दुःखाचे हरण २

फुले वाहू मुर्तीवर । देव मारुतीचा फार
गर्जू जय जयकार । जोवा आनंद अपार ३

मारुतीचा महिमा मोठा । दलिताचा उद्धारता
सर्व विघ्नांची नष्टता । मारुतीची भक्तीकरीता ४

आज ना चुको हा दिन । गाडी हाकला जोरान
हनुमाना वर देना । राहो जोडी जन्मोजन्म ५

(१५)

## उकलू द्या

जिवन माझे अजि उकलू द्या
कनका परि हो अग्नी तेजा
सकष्टाचे महा पुरातुनि
जीवन माझे पार होवू द्या – १

घना घणांचे घाव घालूनि
माणुसकीचे स्वरुप आणा
धन्य होईल, तुमचा देह
स्वरुप येंता मज पाषाना - १

या पाषाणा कोरुनि टाका
कार्यास्तव हो तुमचे हाता
प्रसन्न होई देवी देवता
तुमचे माझे भाग्य फुलता - ३

* * *

(२६)

# अवतरी हरि !

राबूनि शेतात । धान्य पिकवितो
जगांतील लोका । तेंव्हा जगवितो १

खपूनि दमूनि । मकान बांधितो
निवाऱ्याची सोय । सर्वांना करितो २

एक एक धागा । जोडूनि सुताचा
वस्त्र पुरवठा । करि सर्व लोका ३

(२३)

मोठमोठ्या गिरणी । खपती मजूर
भरुनि काढतो । माळाचे कोठार ४

खपतील जरी । तुम्हा आम्हासाठी
दयना याचीच । आहे जग जेंठो ५

यांच्या सुखासाठी । अवतरीं हरी
सुखावे ससार । सर्वाचे बाकरी ६

(२७)

# गुढी

गुढी पाडवा दीन आज हा । गुढी उभारा ही घरोघरा
नव चैतन्यांनी युक्त असा । बाहु द्या हो सतेज वारा १

पत काळाचे जुने बंधन । मोडून टाका सर्व स्थळातून
नव तेजाचा एकच ध्यास । नव रुढीचे बांधा तोरण २

पाने लावा कर्तव्याची । समानतेची घेवून दोरी
नव तेजाची नव जोमाची । गुढी उभारा ही घरोघरी ३

मानवतेच्या विजयासाठी । प्रयत्नांची शर्थ करा
सर्व स्थळांची समानताहि । दिसू द्या ह्या गुढी द्वारा ४

(१८)

# लढा विरांनो स्वानंदाने

धडदडा द्या तोफांचा मारा । शत्रूला परतवा माघारा
सारे जन तुमचे पाठीशी । जे हवे ते पुरवू स्वखुषी १

माजू द्या रणांगण सगळे । शत्रू पाठवा यम सदनें
लढा विरांनो हो स्वानंदाने । दिले अभय रण देवीने २

( चाल बदलवून )

स्वातंत्र्यास्तव आत्म समर्पण । जीवन तुमचे सुफलीत पूर्ण
स्वर्गातील सर्व देवगण । प्रसन्न होतील शौर्य पाहून ३

लढाल जेव्हा प्राण पणाने । माय भूमिचे तोडण्या बंधन
होईल सुटका सर्व जीवातून । मिळेल तुम्हा स्वर्गस्थान ५

(२९)

# श्री लक्ष्मी

तू रूपवंती । गुणवंती । लाजवंती । चतूरवंती १

तू मंगलवंती । सोज्वलवंती । सुखदवंती । प्रेमळवंती २

तू दिव्यंती । शुभवंती । विनाशवंती । रेखावंती ३

तू विजयवंत । चेतनावंती । धनवंती । शिलवंती ४

तू स्वर्गवंती । आनंदवंती । विष्णूवंती । शिलदिव्यंती
– पण – – – ५

जर का पडे थोडे उणे । तिथे तू कधि न थांबणे
सारे ओसाड वाटे जिणे । भकासताच तेथे येणे ६

---

(३०)

# वर्धा शहर

वर्धा शहर हे । सर्वातहि छोटे
परंतु किर्तीने । असे मोठे १

जमनलालजींची । असे पुण्य भूमि
स्वराज्यापूर्वीची । राजधानी २

येथे वास्तव्यहि । होते बापूजींचे
सेवाग्रामी देति । हे पाठ सेवेचे ३

येथे राजकारण । सुरु कॉंग्रेसचे
पाटणींचे आणि । बापूरावजींचे ४

शहर असे हे । छान टुमदारसे
मोकळया हवेचे । सुख आरोग्याचे ५

येथे न दिसे जरि । उच्च धनिकहि
परंतु न दिसे । फार गरीबहि ६

चाले कारभार । साधा शांत चित्त
आनंदमय अशा । वातावरणात ७

शहर आमुचे । वाढो हर दिन
अध्यक्ष झटतसे । श्री सबाने म्हणून ८

पाहिले शहर । जवळून निरखून
यांचा आवडता । विषय राजकारण ९

येथे होवो एक । मोठा कारखाना
कामे मिळतील । मजूरांना १०

हीच होवो पेठ । व्यापाराची मोठी
अनेकहि माल । येति जाति ११

वर्धा हे शहर । होवो सुसंपन्न
येथील नागरिक । होवो धनवान १२

(११)

# पंडित नेहरु

गांधीजींचे शिष्य । म्हणूनि गाजले
अखंड झटूनि । स्वराज्य मिळविले १

स्वराज्या नंतर । मंत्री प्रहा पहिले
पंडित नेहरु । भारताचे झाले २

आमरण यांनी । पद भुषविले
भारतीयांचे । मूकूट ठरले ३

जग विख्यात हे । शांती दूत झाले
सत्य आणि शांती । यास्तव लढले ४

ते गेले तेव्हा । जग हळहळले
अश्रूंचे पाऊस । दाही दिशा पडले ५

सुख शांतीची ही । ज्योत मालवली
काळी दृष्ट छाया । जगावर पडली ६

या छायेचा विनाश होण्या
उपजतील का ? राम श्री हरु
कोटी कोटी जनांची हाक
पुन्हा अवतरो पंडित नेहरु ७

(३२)

# शेतकऱ्याचे स्वप्न

दु:खाची शिदोरी । उराशी बांधुनी
सहन निघालो । मळयाच्या पाहणी -१

मळयातले पीक । वाऱ्याने डोलत
बघता बघनी । हरिख मनात -२

मळयातल्या राशी । येतील मजहाती
हर्ष हो मानसी । तया वर्णू किती -३

एकेक विचार । मनी येत जात
आनदले मन भारावून जात -४

कापसाच्या गाडया । विकेन पेठत
वैभव पूर्वीचे । नांदेल गृहात -५

धन आणि धान्य । साठवून ठेवी
काळाची पावूले । ओळखून भाळी -६

हिऱ्या सोन्या माझे । शेतीचे हे राजे
ओढीत नेतील । पवळयाचे ओझे -७

स्वागता समोरी । दमयती माझी
बाळासह उभी । हर्ष भरे राजी -८

आनंदी आनंद । स्वर्गाच्या समान
भासे शांतिबन । भासे गृहे छान — ९

आशा वैभवाचा । फक्त एक क्षण
रखले मन । विसरलो भान — १०

पुढच्याच क्षणी । कर्जाचा डोंगर
दिसला डोळीया । भेसूर समोर — ११

घाबावले मन । गेले देह भान
जागा एकदम । झालो स्वप्नातून — १२

स्वप्नाच्या कल्पना । स्वप्नात विरल्या
दुःखाच्याच खायी । समोर दिसल्या — १३

स्वप्नाच्या कल्पना । लुप्त आज जरी
अखंड प्रयत्ने । पावेल कां हरी — १४

—०—०

[३३)

# कां

हावरी आणि लाजरी । तू अबोल मधुबाला
वय सोळाचा हा देह । माझे साठी कां त्यागिला १

आई बाबाची प्रेमळ । माया तुझेवर असे
भाऊ ताई इतरहि । तुझे साठी झटतसे २

तसेच धन दौलत । आणि राजवाडाहि
तुझे सुकुमार देहा । तेथले सर्व काही ३

रोम रोमात भरली । सखे साजनी सर्वांच्या
काका-मामा-आजा-आजी । व इतर चाह त्यांच्या ४

त्यागिले तू सर्व कांही । आईचे सुप्रेमालाहि
नांदते तू झोपडीत । सांग माझी का जादू हि ५

दूर दूर गांवातुन । आलीस आस घेवून
स्वमालकी प्रस्थापून । नांदसी सुखे छान ६

लाभू दे तेथेहि स्वर्ग । तुझ्या ह्या आगमनाने
नांदू दे सौख्य पूर्वीचे । तुझ्या कृपा प्रसादाने ७

पालटेल तुझे रुप । जुळ माहेर सासर
सांग माझी का जादू ही । मध्येच कोण येणार ८

०—०

(३४)

# माझा गांव

टेकडीचे पायथ्याशी । आंबे पावीचे रे बन
त्यांत वसे माझा गांव । जणू हा दिसे दडून १

संत्री केळे यांच्या बागा । असे याचे सभोवती
सारे जगामध्ये गाजी । माझे या गांवाची किर्ती २

२४९३
२२८५०
का०५

जवळचे गडावर । उतरा मोटारीतून
या आंत पाऊल वाटे । धाम नदी ओलांडून ३

येथे दिसे भव्य वाडा । पाटोल देशमुखांचा
दगडावर कोरलेला इतिहास शिवाजींचा ४

मध्य गांवात मंदिर । शोभे मारुतीचे
सांज सकाळी हो तेथे । सुर भजन हरिचे ५

येता माझे गांवावर । भारी अचानक धाव
नष्ट कवी सारे जण । असा याचा सुस्भाव ६

येथे नांदती हजार । शेतकरी व कष्टाळू
सवीसांठी विकविती । गहू, तूर, भात साळ ७

या पाहुणे माझें गांवी । ऐका वाजली सनई
रात्री जेवनाचे वेळी । भेटेल पुरण पोळी ८

दूर दूर जात असे । येथिल नांदाया मुली
माझे गांवाची सु किर्ती । सासरला बाढयेली ९

कुस्ती खेळण्या रामाजी । जात असे गांवोगांवी
माझे गांवाचेच नांव । हा कळसाला चढवी १०

आहे येथे ज्या ज्या सोयी । त्या सर्व गावाचे नांवी
आशिर्वाद मारुतीचा । सदा एकजुट व्हावी ११

सुखातला माझा गांव । सुखानच रे ठेवावा
म्हणूनिया भरतसे । कृष्ण भक्तांचा मेळावा १२

विदर्भातला हा गाव । रुखमाईचे माहेर
नाते जोडूनिया ठेवा । श्री मुरारी बरोबर १३

(२५)

# स्मरण (म. गांधी)

आज गांधी जन्म दिन । होते तयाचे स्मरण
भारता दिले स्वातंत्र्य । प्राण पणास लावून १

सर्व सुखाचे वैभवा । दिले यांनी झुगारुन
जागृत केले स्वदेशा । निशीदिनी हो कष्टूनी २

सत्य, अहिंसा व शांती । तीन तत्वे तयांची
प्रभावी ठरली जगी । बोला जय गांधीजींची ३

सत्याग्रह हीच देण । केली तयांनी अर्पण
स्वतंत्रता स्वतंत्रता । असे तयाची ही धून ४

खेडे विभाग असे हा । भारतीयांचे जीवन
विकास व्हावा यांचाच । सांगे गांधीजी गर्जून ५

वेळ न मिळाला यांना । विकास यांचा करण्या
बंधूनो निर्धार करा । गांधी स्वप्न साकारण्या ६

(३६)

# - दिवाळी -

येतात भरीला । पिकांची ही झाडे
आनंद आनंद । जिकडे तिकडे १

संपता दसरा । येईल दिवाळी
सर्व मजुराची । शिजल रे पोळी २

पाच सणांची ही । आहे दीपावली
श्री लक्ष्मी देवता । धरतीवर आली ३

दिसे हर गृही । रात्री दिप पंक्ती
जणू उतरल्या । चांदण्या धरती ४

नवी नवी वस्त्र । घालुनीया मुले
बार उडवित । जणू रणी चाले ५

अंगणी रांगोळी । गृहिणी ह्या भरी
सर्व देवांगण । येथ अवतरी ६

सुरु मिष्टान्नाची । चढाओढ गृही
जुळलेली दिसे । आपसातील दुही ७

पूजतसे सर्व । श्री लक्ष्मी देविला
सुखाचे हे वर्ष । लाभू दे सर्वाला ८

सर्व देवतेस । भावे नमीतरुणी
भाग्याचे दिवस । येवो सर्वांसाठी ९

सजवूनी गाई । गोप खेळविती
बाल श्रीकृष्णाची । आठवण देती १०

भाऊबीज असे । शेवटचे दिनी
ओवाळी भाऊस । प्रेमाने बहिणी ११

दिवाळी मोसमी । माहेरी येती लेकी
सासरचे कौतुक । सांगताती सखी १२

---

(३७)

# हरि भजन

हे परमेश्वरा । दीन दयाळा रे
कृपा करी हरि । राम सावळया रे १

सारे कष्ट केले । उपवासातून
परि राहावया । न झोपडी तृण २

मुले-बाळे उघडी । धरतीवरी ह्या
रुपया न मिळे । सुशिक्षण द्याया ३

तेल, गुळ वस्त्र । ही महाग सारे
जगण्यापेक्षाहि । आज मरण बरे ४

धावा बापा हरि । या घटको वरी
महागाईचा हा । राक्षस ठार करी ५

बेकारांना प्रभू । काम हवे आहे
पोटाहि पुरते । दाम हवे आहे ६

जीवनावश्यक । वस्तू मिळू द्या हो
माफक दरात । प्रभो आम्हाला हो ७

संकट समयी । कंसाला मारिले
राजा मुक्त केले । भक्ता उद्धारिले ८

द्रौपदीस वस्त्र । तू पुरविलेस
भक्ताची श्रीकृष्णा । लाज राखलीस ९

तुम्हा नसे जड । सर्व कांही हरि
मनात आणिता । भक्त इच्छा पुरी १०

त्रस्त जन आज । ह्या महागाईनें
आस पुरी होई । तुझे आगमनें ११

(३८)

# — बाळ —

बाढो फुला सम । बाळ हर दिन
देशाचे रक्षण । करण्याशी १

जिजा माते सम । सांगेन मी सान
करीन पाळन । या बाळाचे २

होताच जवान । रणाला धाडीन
आनंद मानीन । देशहिता ३

महाराष्ट्र माता । कर्तव्य जाणीता
न कमतरता । सैनिकाची ४

गुरु, माँ जानती । बाळाची महती
पुढे याचे हाती । राष्ट्रधुरा ५

—✲✲—

(३९)

# झोपडीत

झोपडीत माझ्या । कशाची न खंत
घालविण्या दिन । झोपतो मी शांत १

झोपडीत माझ्या । दिवा जळे शांत
भासतसे मला । हाच नंदा दीप २

झोपडीत माझ्या । गरीबीची ठेव
शोभतसे मला । हेच हे वैभव ३

झोपडी समोर । छोटे हे आंगण
शोभे तुळशीचे । त्यांत वृन्दावन ४

झोपडीचे मागे । सुंदरशी बाग
त्यांत वाढविले । केळीचे हें बांब ५

तशीच कुंडीत । रोपे वेळा गेली
सुगंधी फुलांनी । शोभिवंत झाली ६

झोपडी समोरी । कपिला हबरी
कामधेनू हीच । प्रगटली खरी ७

शेजारी गोठ्यात । हिऱ्या-सोन्य उभे
माझे झोपडीला । वैभव साजसे ८

सदा सर्व दारि । सुख वाटे मला
तळमळ सारी । परि अंतराला ९

येशिल का गे तू । शमवाया तरी
माझ्या अंतराची । आग शांत करी १०

झोपडीत माझे । येशिल सखे तू
स्वर्गाचे वैभव । निर्मिळ ग तू ११

(४०)

## — भारत —

देश हा भारत । मंगल जगात
आहे शोभिवंत । आणि शांत १

उत्तरेस हिम । सागर दक्षिण
घाली लोटांगण । भारतास २

पूर्वेला बांगला । अरबी पश्चिमेला
विंध्य-सातपुडा । हे मध्याला ३

कोकण किनारी । सह्यांद्रि हा भरी
शिव ललकारी । देत असे ४

गंगा व यमुना । असे स्वर्गीगता
नर्मदा गोदाना । भावे नमी ५

हरभरा देश । त्यागी इतिहास
यथें शौर्य वस । सदावाही ६

रामायण गीत । घरोघरी गात
सदा हा भक्तीत । मग्न दिसे ७

भाषा आणि धर्म । असे भिन्न भिन्न
परि सारी जन । बंधू सम ८

संकट समयी । विसरे भेद हे
एकत्रित होई । देश बंधू ९

शांतीचा हा नेता । शांतीस झटेल
नांव याचे वाढेल । जगामध्ये १०

असा हा महान । जगी मोठा मान
नर रत्न खाण । येथे आहे ११

(४१)

## पावनधार

मृगाची येता ही सर । सृष्टी दिसे हिरीगार
ओहळी तुडुंब जळ । तृप्त सर्वत्र सकळ १

हासे निसर्ग भूवर । स्वागता सुजन समोर
शालू हा धरतीवर । केला बसण्या पसार २

पिकांनी डोले शिवार । पक्षांची असे चंगळ
भरेल धान्य कोठार । हर्षांत जनसागर ३

पडला पावन धार । झाला बदल भूवर
घडे जणू चमत्कार । पावन हा साक्षात्कार ४

मृगाचे सरी प्रमाणें । जो बदल करी ज्ञानें
त्यासहि हे जग नमे । हरिनारायण प्रमे ५

(४१)

# पोळा

धन्य आज दिन । आहे पोळा सण
महिना श्रावण । अमावश्या १

सकाळचे वेळी । खावया हरळी
जाती रानावरी । बैल माझे २

जवळ ओहळी । घालीतो आंघोळी
मध्य ह्या प्रहरी । शेतकरी ३

येताच घराला । साज चढवला
नव्या नव्या झुला । बैला पाठीं ४

घुंगर गळ्यात । शिराला बेगड
बाशिंगाचा जोड । शोभिवंत ५

(४१)

चवळे व माळा । घालुनिया गळा
वाजवीत पोळा । बैल नेती ६

फुटताच पोळा । बैलांचा हा मेळा
मारुती देवळा । पोहचला ७

घरा आली जोडी । लक्ष्मी पाया पडी
पूजूनीया नंदी । मङळकीचे ८

घरोघरी गेली । बैलांची ही जोडी
पुरण व पुडी । जेवावया ९

आनंदी आनंद । वाटे हो बैलाना.
विसाव्याचा दिवा । पोळा सण १०

बाराहि महिनें । कष्ट काळजीनें
ओढी नांगरणें । नंदी बैल ११

शेती पिकविती । बैलांचे मदती
उपकार फेडती । शेतकरी १२

देवते समान । बैलाचे पूजन
करी बहुमान । याच दिनी १३

(४३)

## पणती

असो हा मातीचा । वा दिवा सोन्याचा
चांदी, पोलादाचा । पितळेचा १

(७३)

तेल आणि वात । यांची असे साथ
जळे हळू वात । अंधारात २

भटक्या प्रवाशा । मिळे मार्ग आशा
बघता प्रकाशा । धीर येई ३

जळे सर्वां साठी । नसे भेद दृष्टी
प्रकाशमय सृष्टी । करीतसे ४

जीवनभर ध्येय । झिजावे अक्षय
हे अंधारमय । नष्टवावे ५

तैसे मानवानें । पणती प्रमाणे
अज्ञानी, ज्ञानाने । शिकवावे ६

(७४)

## उत्पत्ती

शिंपल्याचे पोटी । जन्म घेतो मोती
हिऱ्याची उत्पत्ती । कोळशात १

सोने सापडते । चिखल वा माती
पांचूची उत्पत्ती । सागरात २

तैसी महा मूर्ती । जन्मे नीच जाती
जगी पुढे येती । कर्तव्याने ३

उगम नदीचा । ऋषीचे कुळाचा । नाही तपासाच । कदापीहि ४

गरीब श्रीमंत । नको भेदाभेद । आणि जातपात । पुढे येण्या ५

हीच जनसेवा । खरी ईशसेवा । गुण वाढवावा । पुढे येण्या ६

जेव्हा कार्य फळे तेव्हा मूल्यवाढे । जन हात जोडे । पुढाऱ्याला ७

थोर घेती जन्म । महाकर्मातून । कार्यात महान । महानेता ८

(४५)

# आठवा

निर्मी पावसाळा आणि हा हिवाळा
उष्णाचा उन्हाळा । कोणी सांगा १

अफाट हे सागर दूरचे डोंगर
मोठी सरोवर । कोण निर्मी २

आकाश पोकळी चंद्र तारे रवि
प्रकाशता वेळी । कैसे सांगा ३

हरी वनस्पती वाढे नाना रीती
प्राणी लाभ घेती । नाना परि ४

करी भगवत सोयी ह्या अनंत
जेवा मिळे सुख । हरिकृपे ५

(४४)

चिंता मानवाची । देवाचे भोवती
निर्मी ह्या धरती । नाना सोयी ६

हरि हा समर्थ । आहे सर्व श्रेष्ठ
निवारीतो दुःख । भक्ताचेहि ७

घेता हरिनाम । तात्काळ प्रसन्न
संकट हरण । प्रल्हादासम ८

म्हणूनि आठवा । केशवा माधवा
तोच तुझा गाडा । पार करी ९

(४६)

# संत महिमा

संत येता घरी भासे दिवाळी संकष्टांची होळी होत असे १

घेता संत भेटी सर्व दुःख हटी आणि दैन्य उठी सेवकाची २

संतांचा प्रताप जाये पापताप हर्ष गगनात मावेनासा ३

ऐकता संत वाणी मिळे संजीवनी हरीचे चरणी जावयाचीं ४

घेता संत दर्शन उद्धरती जन सर्वा समाधान भासतसे ५

सांगे संत वाणी देवाविणा कोणी श्रेष्ठ त्रीभुवनी सकळासी ६

घेत संत भेटी मुक्ती मार्ग दृष्टि घडे देव भक्ती बोध होता ७

होता संत दर्शन जातसे दुर्गुण मानव सज्जन बनतसे ८

संत हे महान घडता दर्शन तारी पापी जन वाल्या जैसे ९

वाल्या करी खून झाले सुदर्शन जपे रामनाम त्याच क्षणि १०

पुण्यसाठी होता देह बदलता ऋषि हा जगता प्रगटला ११

संतांची वैखरी होत असे खरी सर्वांना उद्धरी संत जगी १२

संतांचे जवळ नसे भेद भाव भक्त एक नांव जोडतसे १३

(४७)

# भक्ताची आस

ओढे वेडे घेत दूषन वाहत हो सागराप्रत नदी धाली १

फिरे ही धरती रवि समोवती वर्षाचे शेवटी प्रदक्षिणा २

दांडाने वाहते जोवन तव ते हरित सदा हे ठेवितसे ३

वासरे धांवती कपिले भोवती भूक भागविती अखेरीस ४

बावड बाळाची आई मिळताची शांती सुमनाची तृप्त होई ५

तसे आम्हा भक्त भक्ती गीत गाता भेटतो देवता धन्य आम्ही ६

(४८)

# अतृप्त

गुलाबाचं फुलं । कितीहि हुंगीलं
नाही शांत झालं । मन माझं १

घेतलं जेवण । पोळीचं पुरण
नाही समाधान । माझ्या जीवा २

जन्मभर केला । संसार चांगला
जीव न विटला । कदापीहि ३

अलोटहि जरी । पैसा वाढो तरी
मुनाफाखोरी । जात नाही ४

कितीकहि काळ । घालविली वेळ
परि ताळमेळ । नाही लागे ५

मोठे सुशिक्षता । विषय वाढोता
मिळे ज्ञान साठा । अपुराच ६

अगाध हे ज्ञान । नच मिळे पूर्ण
घालवू जीवन । पूर्ण जरि ७

(४९)

# बचत

टेरीकॉट साडी । नेसशिल भारी
फिरसी शोभून । ऐटीत शहरी १

जाशिल सिनेमा । आनंदे हरदिन
आवड मनाची । करशिल पुर्ण २

दागदागिण्यांची । हौस तुझी सारी
पुरी होताच तू । शोभेसी सा परी ३

हसऱ्या वदनी । निघे मधू वाणी
भुलविसी जीवा । तू भूल थापांनी ४

पण तुझ चाळे । असे हे क्षणिक
पैसे संपताच । लागेल ग भीक ५

जर वागशिल । तू साधी सरळ
माझ्या मनाला ग । येईलच बळ ६

घरात फिरवी । जर तू पोतोरा
लक्ष्मी नांदेल ग । माझीया स्वघरा ७

बचत योजना । आखशिल जर
माझी महत्वाकांक्षा । होईल साकार ८

(४८)

सहकार्य हवे । तुझे ग या वेळी
नाही तर माझें । जीवनाची होळी ९

महागाई आहे । सारखी वाढत
आवडीला आळा । करावी बचत १०

तुझे वर बोल । काय ? देवूनी या
मी पण व्यर्थ । त्यागावे खर्ची या ११

(५०)

## — वेल —

अचानक रोप । दिसले अंगणी
हळू हळू वाढे । देता खत पाणी १

अनेक दिवसांनी । वाढ झाली पूर्ण
बहरली वेल । सुगंधी फुलान २

एक एक फुल । माळेत गुंफून
केली माळ पुर्ण । हरि पुष्पार्पण ३

तिच्या रोज माळी । ओवियेल्या गळा
सुमनांचा गाभा । घमूस अधिका ४

संपताच वेळ । सुकली ही वेल
शेवटच फूल । डोळ्यांनी पाहिले ५

मानवी जीवन । असे वेली सम
सार्थकी लागवा । वाटतसे पुर्ण ६

(५१)

# श्री बजरंग बली

बजरंग बली । दयाळू कृपाळू
शूर आणि वीर । तसा कनवाळू १

श्री रामाचा भक्त । असे हा परम
सीतेचे शोधन । केले प्रयासान २

बांधला शे सेतू । रामनाम जपून
रामास सुयश । त्यात हनुमान ३

शक्ति लागताच । लक्ष्मण मुर्च्छित
सजीवनी साठी । आणि द्रोण पर्वत ४

बजरंग बली, । देवता प्रसन्न
भक्ताचे संकट, । करी निवारण ५

संकट मोचन, । देव हनुमान
भक्ति करा तुम्ही, । तल्लीन होवून ६

जाल उद्धरुन । तुम्ही भक्त जन
भक्ताचा उपदेश । घ्यावा समजून ७

(५१)

# कृपा दृष्टी

नेसते ग साडी । दिवाळीच्या दिनी
याद त्याची येता । जाते मी लाजूनी १

घालीते ग चोळी । तंग अंगावरी
भाऊच्या ग भेटीं । जाणार माहेरी २

घालीते वाहणा । शुद्ध कानपुरी
चालता चालता । ओवी गाते हरी ३

कुंकु मी लाविते । सौभाग्याची खूण
सुखी ठेवा देवा । पति देव पुणं ४

मागते मी देवा । आणिक न काही
कृपा दृष्टी तुझी । असो सर्वदाहि ५

****

(५३)

# आशिर्वाद

आशिर्वाद देतो तुला । तू घरी जाशिल मुला
नीट लक्ष घालून हा । संसार कर तू भला १

आशिर्वाद देतो तुला । तू शेतावर जा मुला
स्वयंकष्ट करुन रे । निपजवी तू अन्नाला २

आशिर्वाद देतो तुला । स्व कामावर जा मुला
तन मनाने झटून । वाह देह देश सेवेला ३

आशिर्वाद देतो तुला । तू सीमेवर जा मुला
देश रक्षण करण्या । समर्पवी तू देहाला ४

REFBK-0022850
REFBK-0022850



# — स्त्री —

धन्य भगवंत । निर्मियेली मूर्त
दिव्य शोभिवंत । स्त्रीया जगी १

म्हणे आई कोणी । म्हणे कोणी पत्नी
समान बहिणी । लेखी कोणी २

कांही जरी नाती । रत्ना जन्मदेती
जना उद्धरती । जगात स्त्रीं ३

मानती ही श्रेष्ठ । आणि कर्म निष्ठ
नाते वाढवित । स्त्री जगात ४

जनाचा विस्तार । वाढवी अपार
शोभे धरतीवर । ही पासून ५

हिचाच आदर । करी जनी सागर
हिला धरतीवर । मानी देवी ६

कशी हि असो ही । परि माझी देवी
कृपा दृष्ट ठेवी । माझे आई ७

जरी ही अबला । क्रोध जेव्हा आला
सज्ज लढण्याला । लक्ष्मी सम ८

शोभतसे गृही । देवता लक्ष्मी ही
प्रसंगी गाजवी । समर ही ९

हाती जर आला । अचानक भार
तरी हि सांभाळ । करितसे १०

दयाळू, मायाळू, । आणि कृपाळू
सर्वांला सांभाळू । असी हि स्त्री ११

सर्व गुण युक्त । घडवि स्त्री मूर्त
सुंदर जगात । सांगा कोण ? १२